# ई-पीक पाहणी

**प्रा. श्वेता मयेकर**
सहाय्यक प्राध्यापिका (विस्तार शिक्षण विभाग)
कृषी महाविद्यालय, फोंडाघाट

आतापर्यंत शेतकऱ्यांच्या पिक पेऱ्याची नोंद ही तलाठी यांच्यामार्फत केली जात होती. प्रत्यक्ष गटात न जाता शेतकरी ज्या पिकाची नावे सांगेल त्याच पिकाचा पेरा झाला असे ग्राह्य धरुण त्याची नोंद होत असत. त्यामुळे नुकसान भरपाईच्या दरम्यान अनेक अडचणींचा सामना आधिकारी यांना करावा लागत होता. अनेक शेतकऱ्यांच्या पिकाच्या नोंदी नसतानाही शासकीय मदत लाटली जात होती. शेतकऱ्याने पेरलेल्या पिकाची अचूक नोंद शासन दप्तरी व्हावी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा व्हावा या दृष्टीने 'ई-पीक पाहणी' ॲप निर्माण करण्यात आले आहे. यामाध्यमातून शेतकऱ्याने कोणत्या गटामध्ये कोणते पिक घेतले आहे याची नोंद तर होणारच आहे शिवाय ते ठिकाणही अक्षांश / रेखांशमध्ये नोंद केले जाणार आहे.

'ई-पीक पाहणी' चे हे पहिलेच वर्ष आहे. असे असतानाही सर्व शेतकऱ्यांना समावून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. नुकसान भरपाईची तक्रार नोंदवण्यासाठी 'फार्ममित्र' हे ॲप आहे तर पिक पेऱ्याची माहिती नोंदवण्यासाठी ई-पीक पाहणी हे ॲप आहे.

### 'ई-पीक पाहणी'चे फायदे:

- 'ई-पीक पाहणी' या ॲपमुळे शेतकऱ्यांच्या पीक पेरणीची अचूक नोंद होणार आहे.
- या ॲपरील नोंदीमुळे राज्यात, देशात एखाद्या पिकाचा पेरा किती झाला आहे याची अचूक आकडेवारी एका क्लिकर उपलब्ध होणार आहे.
- पिकाच्या अचूक आकडेवारीमुळे उत्पादनाबद्दल अंदाज बांधता येतो. यावरुन भविष्यात बी-बियाणे लागणारे खत हे पण उपलब्ध करुन देता येणार आहे.
- पिकाच्या छायाचित्रामुळे किती अक्षांश: आणि किती रेखाअंशावर कोणत्या पिकाचा पेरा झाला आहे हे समजते.
- एका मोबाईलहून २० शेतकऱ्यांच्या नोंदी करता येणार आहेत.

### 'ई-पीक पाहणी' ॲपमधील त्रुटी:

- 'ई-पीक पाहणी' बाबत शेतकऱ्यांना आतापर्यंत योग्य जनजागृती आणि मार्गदर्शन झालेले नाही.
- अत्याधुनिक प्रकारचे मोबाईल वापराची माहिती शेतकऱ्यांना नाही. ॲपमध्ये नेमकी माहिती भरायची कशी हेच शेतकऱ्यांना माहिती नसल्याने शेतकरी या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करीत आहेत.
- यंदा अशाप्रकारे माहिती भरुन घेतली जात आहे. मात्र, दरवर्षी अशाच प्रकारे शेतकऱ्यांना माहिती द्यावी लागणार हे स्पष्ट नाही.

### अशाप्रकारे करा शेतातील पिकाची ई-पिक पाहणी:

शेतकऱ्यांनी प्ले स्टोअर मधून 'ई-पिक पाहणी' हे ॲप डाऊनलोड करुन घ्यायचे आहे. हे ॲप ओपन करुन नविन खातेदार नोंदणी करुन घ्यावयाची आहे. यासाठी आपला जिल्हा, तालुका आणि गावाची निवड करुन त्यानंतर खातेदारमध्ये पहिले नाव, मधले नाव, आडनांव आणि गट क्रमांक टाकायचा आहे. त्यानंतर खातेक्रमांक तपासून आपला मोबाईल नंबर टाकायचा आहे जो पुन्हा बदलता येणार नाही. त्यानंतर मोबाईलवर चार अंकी पासवर्ड येईल तोच या ॲपमध्ये नमूद करावा लागणार आहे. यानंतरच तुमची नोंदणी यशस्वी होणार आहे. यानंतर ॲप हे पूर्णपणे बंद करुन चालू करायचे आहे. ॲप पुन्हा चालू केल्यानंतर पुन्हा तुम्हाला खातेदार म्हणजे तुमचे नाव निवडावे लागेल. मॅसेजद्वारे आलेला पासवर्ड येथे नमूद करायचा आहे. त्यानंतर पुढे जाऊन परीचयमध्ये खातेदाराचा फोटो अपलोड करायचा त्यानंतर दिलेली माहिती भरुन सबमिट करायचे.

त्यानंतर होममध्ये येऊन पिकाची माहिती नोंदवा असा एक फॉर्म येतो. यामध्ये खातेक्रमांक नंतर गट क्रमांक, जमिनीचे क्षेत्र हे हेक्टरमध्ये भरायचे यानंतर हंगाम निवडायचा म्हणजे खरीप की संपूर्ण वर्ष ते निवडायचे, त्यानंतर पिक पेरणीसाठीचे क्षेत्र किती याचा उल्लेख करायचा आहे. त्यानंतर पिकाचा वर्ग यामध्ये जे आपलं पिक आहे तेच निवडायचे यातील वेगवेगळे प्रकारही असू शकतात. त्यानंतर दिलेल्या पर्यायापैकी तुमचं कोणतं पिक ते निवडायचे आहे. पुन्हा त्या पिकाचे क्षेत्र भरायचे. त्यानंतर सिंचनाचे साधन काय आहे त्याचा उल्लेख करायचा त्यानंतर ठिबक पध्दती कशी आहे याची दिलेल्या पर्यातून निवड करायची. त्यानंतर पिक लागवडीची तारीख याची नोंद करायची. त्यानंतर कॅमेराचा पर्याय येईल यातून फोटो काढायचा आणि तो फॉर्म सबमिट करायचा आहे. सबमिट झाल्यानंतर पुन्हा होमवर यायचं यामध्ये पिकाची माहिती यावर क्लिक करायचे यामध्ये तुम्ही भरलेली माहिती दिसेल. ही माहिती संबंधित सर्वरला पाठवण्यासाठी अपलोड या बटनाला क्लिक करायचे आहे. त्यानंतर आलेल्या दोन पर्यापैकी परिचय माहिती क्लिक करुन माहीती अपलोड झालेली पहायला मिळते, त्याच प्रमाणे पिक माहितीवरती क्लिक करुन अपलोड करायचे आहे. अशाप्रकारे 'ई-पिक पाहणी' या ॲपद्वारे आपल्याला पिकाची माहिती भरता येते.

(संपर्क: +९१ ७४९९६७४६८२)

★ ★ ★